# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान

| | | |
|---|---|---|
| **पीक व वाण** | : | **काळीमिरी** |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २००४** |
| रोग व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | काळया मिरीवरील खोडकूज व पानावरील करपा रोगाचा प्रादुर्भाव कमीत कमी ठेवण्यासाठी सिल्व्हर ओक + काळीमिरी ही पीकपध्दती अवलंबावी. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २००७** |
| खत व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | काळीमिरीचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रती मिरी वेलावर जून, सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या महिन्यात २५ टक्के ८ दिवसांपर्यंत साठविलेल्या गोमुत्राची फवारणी व २५ टक्के १ लि. द्रावणाची जमिनीत जिरवणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे या सोबत शिफारशीत केलेल्या खताच्या मात्रा देण्यात याव्यात |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१०** |
| रोग व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | काळी मिरीवरील फायटोफ्थोरा कॅपसिसि बुरशीजन्य पर्णकरपा आणि बुंधाकूज रोगांच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डो मिश्रणाची फवारणीबरोबर ०.१ टक्का कॉपर ऑक्सिक्लोराईड मुळांभोवती मातीत मिसळावे किंवा ०.३ टक्के पोटॅशिय फॉस्फोनेटची फवारणी अधिक ट्रायकोडर्मा हरजियानम ५० ग्रॅम प्रति वेल अधिक १ किलो निंबोळी पेंड मुळांभोवती मातीत मिसळण्याची शिफारस करण्यात येत आहे. वरीलपैकी कोणत्याही एका संस्काराची पहिली मात्रा पावसाळा सुरु होण्यापूर्वी आणि दुसरी मात्रा दोन महिन्यांनी देण्यात यावी. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०११** |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | काळीमिरीच्या अभिवृध्दीसाठी शेंड्याकडील फांद्यांचा वापर करुन त्यांचे पानरहित दोन पेरे असलेले तुकडे सुडोमोनस फ्ल्युरोसन्स $१०^८$ च्या भुकटीमध्ये किंवा २ टक्के साखरेच्या द्रावणात १ मिनीट बुडवून लागवड करण्याची शिफारस करण्यात येते. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१७** |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | कोकणात झुडुपवर्गीय काळीमिरीपासून अधिक उत्पादन मिळविण्यासाठी रोपांची लागवड ५० टक्के सावली गुणांक असलेल्या हिरव्या रंगाच्या शेडनेटमध्ये १ × १ मीटर अंतरावर करण्याची शिफारस करण्यात येते. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१८** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | नारळ बागेत अधिक उत्पादन व नफा मिळवण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे दालचिनी, जायफळ, काळीमीरी, केळी आणि अननस या पिकांची आंतरपिक म्हणून लागवड करण्याची शिफारस करण्यात येते. |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | जायफळ, कोकमाची कलमे आणि काळीमिरीची छाट कलमे अधिक यशस्वी होण्यासाठी आणि त्यांच्या चांगल्या वाढीसाठी बंद अभिवृध्दी गृहाचा (आकार १०.५ मि. लांबी × ३.१० मि. रुंदी × २ मि. उंची) वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. |